श्री.विनोद भागोराव भिसे, आरोग्य पर्यवेक्षक, यांचे गैरवर्तन प्रकरणी विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता अधिकारी यांची नेमणुक करणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. आरोग्य/कार्या-२/आस्था-३/११४९/२०२५
अहिल्यानगर दिनांक- २८/१२/२०२५

वाचा :- १. या कार्यालयाकडील आदेश क्र. आदेश क्र. आरोग्य/कार्या-२/ आस्था-३ /८८६/२०२५, दिनांक- ०१/१०/२०२५
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले यांचेकडील पत्र क्र. वशि/आस्था-१/२७२०/२०२५, दिनांक-२७/१०/२०२५
३. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ (३) व (५) नुसार

उपरोक्त संदर्भ क्र.१ चे आदेशान्वये, श्री.विनोद भागोराव भिसे, आरोग्य पर्यवेक्षक, यांचे गैरवर्तन प्रकरणी विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता अधिकारी म्हणून श्री.कैलास कचरु येलमामे, कक्ष अधिकारी, पंचायत समिती अकोले, यांची नेमणूक करणेत आली होती.

संदर्भ क्र.२ चे पत्रान्वये, श्री.कैलास कचरु येलमामे, कक्ष अधिकारी, हे दिनांक- ३१/१२/२०२५ रोजी नियतवयोमानानुसार सेवा निवृत्त होत असल्याने त्यांचे ऐवजी श्री.सुनिल जगन्नाथ मंगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, यांनी नेमणूक करणेबाबत कळविले आहे.

तरी या आदेशान्वये, संदर्भ क्र.१ चे आदेशामधील श्री.कैलास कचरु येलमामे, कक्ष अधिकारी, यांची सादरकर्ता अधिकारी म्हणून केलेली नियुक्ती रद्द करणेत येत आहे. त्यांचे ऐवजी श्री.सुनिल जगन्नाथ मंगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती अकोले यांची सादरकर्ता अधिकारी म्हणून नेमणूक करणेत येत आहे.

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याचप्रमाणे दोषारोपामध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी. परिशिष्ट क्र. तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. वरीलकामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्र.202512271002 93 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 27-12-2025 12:29:48
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प. कर्मचारी), नाशिक विभाग, नाशिक.

२. श्री.सुनिल जगन्नाथ मंगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती अकोले

३. श्री.कैलास कचरु येलमामे, कक्ष अधिकारी, पंचायत समिती अकोले, व्दारा व प्रत- गटविकास अधिकारी, पंचायत समिती अकोले, ता.अकोले, जि.अ.नगर

२/-सदर आदेशाची प्रत श्री.कैलास कचरु येलमामे, कक्ष अधिकारी, व श्री.सुनिल जगन्नाथ मंगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

४. श्री.विनोद भागोराव भिसे, सेवा निलंबित आरोग्य पर्यवेक्षक, व्दारा- गटविकास अधिकारी, पंचायत समिती राहाता, ता.राहाता, जि.अ.नगर

२/-सदर आदेशाची प्रत श्री.विनोद भागोराव भिसे, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्वाक्षरी/-
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर